# टकटक

- नीलिमा कुलकर्णी , रेस्टन , VA

रात्री अकरा वाजता सार्जंट माईकचा फोन आला. “सँडी, घरातल्या अत्याचाराची केस आलीय. intresting आहे.” तो म्हणाला. घरातील अत्याचारांना (Domestic violence)ला बळी पडलेल्या लोकांना मदत करण्याऱ्या संस्थेमध्ये व्होलेंटीअर म्हणून गेली दहा वर्षे संध्या म्हणजे सँडी काम करीत होती. असा फोन आला की पोलीस स्टेशनमध्ये जायचं आणि त्या मार खालेल्या व्यक्तीला मदतीचे मार्ग दाखवायचे, प्रसंगी सुरक्षिततेसाठी संस्थेच्या गुप्त जागी असलेल्या “सेफ हाउस” मध्ये सोय करायची, पुन्हा पुनर्वसनासाठी मदत करायची हे तिचे काम.

ती पोलीसस्टेशनकडे निघाली. माईक आणि ती गेली अनेक वर्षे एकत्र काम करीत होती. त्यामुळे तिचे “इंटरेस्ट” त्याला माहित झाले होते. इंटरेस्टिंग म्हणजे बहुतेक भारतीय वंशाच्या लोकांची केस असेल. तशा या भागात भारतीयांच्या केसेस कमी यायच्या. नेहमीप्रमाणे खास दाराने ती पोलीस स्टेशनमध्ये गेली. माईक म्हणाला, “आजच्या केसवर तू विश्वासच ठेवणार नाही.” त्याने केसपेपर तिच्या हातात दिले. लोकांची प्रायव्हसी जपण्यासाठी पोलीस प्रत्येक केसला एक टोपण नाव देतात. ह्या केसला “केस झी” नाव होतं.

“आपण त्याला मिस्टर झी म्हणू? आणि बाईला?“ माईक

“झुम्मा!” सँडी सहज बोलून गेली.

पुढे केस वाचू लागली. सोफ्यावर टीव्ही पहात बसलेल्या मिस्टर झीला त्याच्या बायकोने, झुम्माने स्वयंपाकघरातल्या सुऱ्याने पाठीमागून भोकसले. फिर्यादीला दवाखान्यात नेऊन टाके घालण्यात आले आहे. झुम्माने आपला गुन्हा कबूल केला आहे. खात्री करून घेण्यासाठी सँडीने ती केस पुन्हा वाचली. बाईने पुरुषाला मारले, तेही भारतीय बाईने? बहुतेक मारहाणीच्या केसेसच्या बळी स्त्रिया असतात. ५% पुरुष असतात असं कुठेतरी वाचलं होतं. पण प्रत्यक्ष पहाण्याची पहिलीच वेळ. तिचे डोळे विस्फारले. मिस्टर झी वय वर्षे २६, झुम्मा वय वर्षे २३. वर्षापूर्वी लग्न होऊन ती भारतातून आली. झी h1b व्हिसावर होता. झुम्मा H4 व्हिसावर.

“unbelievable! बघू तर कसा आहे हा आजचा “बळी”?’ तिने माईकला म्हटलं. दोघे कन्सल्टिंग रुमच्या दाराशी गेले. दाराच्या छोट्या काचेच्या खिडकीतून तिने आत पाहिलं. दोन्ही हात लांब पसरून टेबलाच्या कडा धरून तो बसला होता. ६ फूट २ इंच उंच म्हणजे भारतीय लोकांच्या मानाने चांगलाच उंच आणि धिप्पाडही होता. चांगल्या घरचा दिसत होता. पण डोळ्यात एक मगृरीचा भाव होता. रोजच केसेस बघणाऱ्या तिच्या सराईत डोळ्यांना त्याच्या डोळ्यातले भाव काही “बळी”चे वाटत नव्हते. ते दोघे त्याच्याकडे बाहेरून बघत असतांनाच अस्वस्थपणे त्याने टेबलावर बोटाने टकटक करायला सुरवात केली.

“Does he look like a victim to you ?” तिने अविश्वासाने माईकला म्हटलं.

“well, अशा गोष्टी घडतात. म्हणूनच आपण कुठलाही पूर्वग्रह न धरता काम करायचं म्हणतो” माईक खांदे उडवत म्हणाला. ती मनाशीच म्हणाली, खरं आहे, पण आपल्या अनुभवावरून आपण काही अंदाज बांधतो, गट फिलिंग. तिचे गट फिलिंग त्याला victim म्हणायला तयार नव्हतं.

“ओके, आता एवढ्या मोठ्या धडधाकट व्यक्तीला मारण्याचे धाडस करणारी बाई मला बघायची आहे.’ ती

“यस, धाडस म्हण किंवा गुन्हा! तिने केलं आहे. त्याच्या खांद्यावर जखम आहे आणि तिने तसं बयान दिलं आहे. That’s a fact” म्हणत बिल्डींगच्या दुसऱ्या बाजूच्या खोलीकडे माईक तिला घेऊन गेला. माईकने तिथल्या पोलिसांना टेक्स्ट करून आपल्या येण्याची वर्दी दिली होती. दाराजवळ जाताच त्याने आधी दारावर टकटक केली, आणि दार उघडलं. “नही, नही” झुम्मा ओरडली. सगळे चपापले.

“आता हिला काय झालं कोणास ठाऊक! आत्तापर्यंत मान खाली घालून बसली होती.” तिथला पोलीस म्हणाला. “नॉक, नॉक म्हणजे हिंदीत नही नही का?” माईकने विचारलं. सँडीने मानेनेच नाही म्हटलं.

सँडीने तिच्याकडे पाहिलं. झुम्मा - जीन्स आणि टीशर्ट घातलेली मुलगीवजा बाई. साधारण ५ फुट २ इंच उंच. मिस्टर झी च्या मानाने अगदीच किरकोळ. झुम्माने पुन्हा मान खाली घातली.

“क्या आपने उसे चाकूसे मारा है?” सँडीने हिंदीत विचारलं. त्याबरोबर ती दचकली. मानेनेच हो म्हणाली.

“तुला जेलमध्ये जावं लागेल, नंतर deport होशील, कधीच या देशात परत यायला मिळणार नाही. माहित आहे तुला?' तिने पुन्हा होकारार्थी मान हलवली. “हा गुन्हा खुनाचा ठरू शकतो, त्याला काय भयानक शिक्षा असते माहित आहे?”

'हो, डेथ पेनल्टी मिळाली तर बरंच होईल” ती पुटपुटली .

सँडी व माईक रुमच्या बाहेर आले. थोडा विचार करून सँडी म्हणाली. “ही केस मी victimच्या बाजूने घेऊ शकत नाही. झुम्मा गुन्हेगार आहे असं मला वाटत नाही“ तिने तिच्या संस्थेच्या डायरेक्टरला, टीनाला बोलावून घेतलं. टीनाने केस घेतली. मिस्टर झीला भेटून नेहमी संस्थेतर्फे जशी victim ला माहिती देतात तशी सर्व माहिती दिली.

“मला सेफ हाउसमध्ये जागा मिळेल का? आता restraining ऑर्डरचे नियम बदलले आहेत, २४ तासाने गुन्हेगार घरी जाऊ शकतो. म्हणून मला तिची भीती वाटते. मला संरक्षण हवे आहे.” मिस्टर झी म्हणाला.

आता थक्क होण्याची टीनाची पाळी होती. ती खोलीच्या बाहेर आली. सँडीला म्हणाली, “हा तिला एका हातात घेऊन उचलून फेकून देऊ शकतो आणि म्हणतोय मला संरक्षण हवे आहे. I can’t believe it! But we have to take victim’s side” सेफ हाउसमध्ये मारहाणीच्या बळी असणाऱ्या ४६ स्त्रिया होत्या. आणि एक पुरुष - तोही त्याच्या सहा महिन्याच्या मुलीला बायकोने मारहाण केली म्हणून त्या बाळासाठी तिथे राहिला होता. “आता या धडधाकट माणसामुळे उगाच सेफ हाउसमध्ये रेपची केस ऐकायला यायला नको उद्या.“ टीना म्हणाली. टीनाने सेफ हाऊसला फोन करून तिथल्या सिक्युरिटी गार्डच्या समोरची खोली ह्याला द्यायला सांगितली.

सँडीच्या डोक्यात एकदम एक कल्पना चमकली. हि “रेप केस” तर नसेल? ती परत झुम्माकडे गेली. पण झुम्माने “छे! रेप कसली. मी रेप टेस्ट करणार नाही” म्हणून निक्षून सांगितलं. तिचे बयान तसेच कायम होते. त्याचं सामान आणण्यासाठी माईक त्याला त्याच्या घरी घेऊन गेला. आणि त्याच्या कपाटात एक वेगळीच गोष्ट आढळली. ती पाहिल्यावर माईकने बेडरूममध्ये पोलिसच्या नजरेने टेहेळणी केली. त्याला आत्ताच सँडीला फोन करून सांगावंसं वाटत होतं, पण रात्रीचा एक वाजला होता. तेव्हा त्याने दुसऱ्या दिवशीपर्यंत थांबायचं ठरवलं.

पेपरवर्क संपवून सँडी घरी पोहोचली. रात्र बरीच झाली होती पण तिला झोप येत नव्हती. असं कसं शक्य आहे? २३ वर्षाची नुकती भारतातून आलेली मुलगी इतकी हिंसक होऊ शकते का? सोफटवेअर इंजिनीअर - म्हणजे शिकलेली. व्हिसा नाही म्हणून तिला नोकरी करता येत नाही, नाहीतर त्याच्या इतकेच पैसे तिला मिळाले असते. डोक्यात फरक असेल का तिच्या? की त्याने प्रेशर घातलं असेल म्हणून तिने गुन्हा कबूल केला असेल? घरात दोघेच, आणि जखम त्याला आहे, तेव्हा तिने वार केला हे नक्की आहे. पण का? तिला त्याचा इतका राग येण्याचे काय कारण असेल? आणि ते कारण तिला यातून सोडवायला पुरेसं होईल का? झुम्मा एके झुम्मा - विचारांच्या वावटळीत सँडी रात्रभर गोलगोल फिरत राहिली.

त्यानंतर नेहमीचे काम सुरु होतं पण झुम्माचे विचार तिला स्वस्थ बसू देत नव्हते. लंचटाईममध्ये माईकचा फोन आला. सँडीच्या चेहऱ्यावर विजयाचे स्मित उमटले. “सी, आय टोल्ड य सो” ती म्हणाली. आणि न राहवून सँडी झुम्माला भेटायला जेलमध्ये गेली.

तिच्याशी बोलून माहिती काढायचा प्रयत्न केला. ‘तू मला सगळं सांगितलं तर मी तुला मदत करू शकेन. पाहिजे तर तुझ्या वकिलाची फी भरण्याची माझी तयारी आहे. माझे मन सांगतंय तू गुन्हेगार नाहीस.”

“कैसे? आपको क्या मालूम है मेरे बारे मे? क्यो आप मेरेलिये कुछ करना चाहती हो?” झुम्मा

“कशासाठी ते सांगेन कधीतरी” डोळ्यात आलेले पाणी मागे परतवत सँडी म्हणाली.

“आज तुझ्याबद्दल बोलू.”

“मी नाही काही सांगू शकत.” ती रडायला लागली. तिला समजावून सँडी बाहेर पडली.

दुसऱ्या वेळी सँडी वकिल वीणाला घेऊन गेली तेव्हा तिथला गार्ड म्हणाला,
“मॅम, मी तिला हातकड्या न घालता आणू का? अशी तर वाटते भित्री मांजर! फक्त दारावर कोणी टकटक केलं तर ओरडते, आणि हातकड्या पाहिल्या की गोंधळ करते. हातकड्या न घालता आणतो, मी आहेच इथे तिने काही गडबड केली तर” सँडी आणि वीणाने एकमेकींकडे पाहिलं. काल झीच्या घरात माईकला हातकड्या सापडल्या होत्या. आता हातकड्या हा आणखी एक कुतूहलाचा विषय झाला होता.
सँडी आणि वीणा बसल्या होत्या तिथे घाबरत घाबरत झुम्मा आली. त्यांच्यासमोर खाली मान घालून बसली. काही मिनिटे तशीच गेली. सँडीने टेबलावर टकटक केलं. झुम्माने दचकून वर पाहिलं. तिचा चेहरा घामाघूम झाला होता.
“शांत हो. मी तुझी वकील आहे, तू मला पूर्ण हकीकत सांगितली नाही तर मी कशी मदत करणार?” वीणा
“मला नकोय मदत, मला मृत्युदंड हवाय.” झुम्मा
‘हं! या देशात तेही इतकं सोपं नाही. सगळ्याच खुनाच्या गुन्हेगारांना मृत्युदंड मिळत नाही. खितपत पडशील तुरुंगात. तू फक्त २३ वर्षांची आहेस. पुष्कळ पडलंय आयुष्य पुढे” वीणा
“त्याचाच तर कंटाळा आलाय. हे कसलं जिणे!” झुम्मा म्हणाली.
“वार करूनही तो अजून जिवंत आहे, तेव्हा कदाचित केस संपल्यावर तुला भारतात जाता येण्याची शक्यता आहे.” वीणा
‘आणि काय करू? इथलं सगळं रामायण ऐकल्यावर, माझ्या बहिणींची लग्न होणार नाहीत.’ झुम्मा
‘कुठल्या जमान्यातल्या गोष्टी करतेयस?’ वीणा
“आमच्या समाजात अजून तसंच चालतं” ती म्हणाली. झुम्माचं डोकं पूर्ण सटकलेले नाही याची वीणाला खात्री झाली.
“तुमच्या घरात बेडला हातकड्या अडकवल्याच्या खुणा आहेत.” वीणाने विचारलं.
झुम्माने शरमेने डोकं टेबलावर टेकले. ती भेट फक्त रडण्यात संपली. दोन चार भेटीनंतर झुम्मा थोडी मोकळं बोलायला लागली. सँडी तिला म्हणाली, “हे बघ, जर तुझ्या नवऱ्याने त्रास दिला म्हणून तू नाईलाजाने चाकू मारला हे सिध्द झालं तर तू सुटू शकशील, Vawa (violence against women’s act”) खाली तुला इथे व्हिसा मिळून या देशात तुला तुझे आयुष्य स्वतंत्रपणे सुरु करता येईल.” सँडी
पहिल्यांदाच झुम्माच्या डोळ्यात जीव आला. “तुम्ही माझी माहिती काढून घेण्यासाठी खोटी आशा दाखवताय नं?” झुम्मा अविश्वासाने म्हणाली.
“हे बघ, मला यातून काहीच मिळणार नाहीये, मी तुझ्या वकिलाची फी देतेय कारण माझं मन मला सांगतंय तू गुन्हेगार नाहीस. पण ते कायद्याने सिद्ध करायला पाहिजे. म्हणून तुला वकिलाला सगळी हकीकत सांगायलाच पाहिजे.”
”पोलिसांना तुझ्या घरात हातकड्या सापडल्या, त्या कुठून आल्या घरात?” सडी
झुम्मा थरथर कापू लागली. “त्याने कुठून आणल्या मला माहित नाही खरंच. पण रोज वापरायचा तो.”
“कशासाठी?” वीणा म्हणाली.
झुम्माने स्वत:चे हात पुढे करून दाखवले. तिला आवेग अनावर झाला. थोडी शांत झाल्यावर तिने सांगायला सुरवात केली.

एक वर्षापूर्वी ती लग्न करून भारतातून आली. तिकडे भारतात घरचा श्रीमंत, एकुलता एक म्हणून तो लाडावलेला आहे. त्याला “नाही” म्हणून उत्तर आवडत नाही. सुरवातीचे काही महिने मजेत गेले. पण त्याला मित्र असे कुणीच नाही. ४ महिन्यांनी त्याचे प्रोजेक्ट संपलं. तेव्हा तो सतत घरीच होता. जॉब अप्लिकेशनला रिस्पोन्स मिळत नव्हता. शेवटी घरात कंटाळून त्याने कसलेतरी घाणेरडे सिनेमे पहायला सुरवात केली. मला तिथे बसवायचे नाही. एकदा मी स्वयंपाक करीत होते, दुपारी बाराची वेळ, तो स्वयंपाकघरात आला, आणि तिथेच माझे कपडे काढायला त्याने सुरवात केली. अपार्टमेंटच्या खिडक्या उघड्या होत्या. मला किळस आली, मी त्याला ढकलले. तो रागावला आणि घराबाहेर पडला. संध्याकाळी आला तो कुठूनतरी हातकड्या घेऊन! मला काही कळायच्या आत त्याने माझ्या हातात

हातकड्या अडकवल्या, मला उचलुन पलंगावर ठेवलं, तिथे हातकड्या बांधून त्याला पाहिजे तसं सुख ओरबाडून घेतलं. तेव्हापासून त्याला पाहिजे तेव्हा त्याने अशाच पद्धतीने सुख लुटायला सुरवात केली. नंतर त्याला जॉब मिळाला खरा, पण दोन महिन्यातच तिथे एका लेडी क्लीनरवरून काहीतरी भांडण झालं आणि त्याचा जॉब गेला. पुन्हा गेले तीन महिने तो घरी आहे, दिवसभर घाणेरडे सिनेमे पहातो. कोचावर बसून सिनेमा पहाताना मध्येच त्याला लहर येते, तो मला हाक मारतो, मी आले कि टेबलावर टकटक करतो, म्हणजे मी हातकड्या घेऊन त्याच्यापुढे यायचं. तो हातकड्याने मला पलंगाला बांधतो आणि वाटेल तसे हाल करतो. कधी नुसताच सगळीकडे चावतो, कधी ओरबाडतो, आणि जबरदस्ती.... "  ती ओक्साबोक्शी रडायला लागली.

"त्यादिवशी मी भाजी चिरत होते, त्याने हाक मारली. दिवसातली ती तिसरी वेळ होती. माझे अंग ठणकत होतं. माझ्या डोक्यात तिडीक गेली. हातात चाकू होता. त्याने टेबलावर टकटक केली. माझा संताप असह्य झाला. टीव्हीवर किळसवाणे दृश्य होतं, त्या दिव्यातून आता मला जावे लागणार हे स्पष्ट दिसत होते. माझी सहनशक्ती संपली, आणि हातातला चाकू मी त्याच्या खांद्यावर मारला. पण तो झरकन मागे वळला, माझा हात घट्ट धरला. आणि म्हणाला, "छानच झालं, आता तू जेलमध्ये जाशील, मी सेफ हाउसमध्ये ६ महिने मजा करीन. तोपर्यंत मिळेलच दुसरा जॉब! माझी तर झाली सोय. आणि दुसऱ्या हाताने त्याने पोलीसला फोन केला." गोष्ट संपल्यावर सडीने तिला घट्ट मिठी मारली.

"अगं, ही रेपची केस झाली." सँडी म्हणाली.

"कैसी रेप? वो तो मेरा शोहर है!" झुम्माने आश्चर्याने विचारलं.

"हो शोहर म्हणजे  नवरा असला तरी तुझ्या मनाविरुद्ध करतोय म्हणून ती रेप धरली जाते!" वीणा.

पुढे चौकशीत पलंगावरच्या हातकड्याच्या खुणांनी, आणि तिच्या अंगावरच्या व्रणांनी झुम्माची कथा सिद्ध झाली. निकाल लागला तेव्हा तो जेलमध्ये आणि तिला संरक्षण मिळाले. VAWA अंतर्गत व्हिसा मिळून सोफ्टवेअर इंजिनिअर झुम्मा एका मोठ्या कंपनीत रुजू झाली. एक दिवस सँडीशी बोलताना तिने विचारलं,

"आपने मेरे लिये इतना क्यो किया?

"भारतात असताना माझ्या बहिणीसाठी काहीच करू शकले नव्हते. तिच्या डोळ्यात जे भाव होते तेच मला तुझ्या डोळ्यात दिसत होते. जस्ट अ गट फिलिंग! मी केलं ते त्या केविलवाण्या नजरांसाठी."

- नीलिमा कुलकर्णी

(Domestic violence या सत्यपरिस्थितीवर आधारित! बाकी पात्र, प्रसंग सर्व काल्पनिक)